**सत्र खटला क्र. ८०/२०२३ मधील फौजदारी जामीन अर्ज**

**महाराष्ट्र शासन**
**वि.**
**गजानन देवराव रोही + २**
**(CNR NO. MHBU20-000649-2023)**

## नि.क्र. ३ खाली आदेश
## (पारीत दिनांक १९ डिसेंबर २०२३)

**०१]** प्रस्तुत अर्ज अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३९ अन्वये पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथील अपराध क्र. २५६/२०२३ कलम ३०२,१२० (ब) भा.दं.वि. खालील गुन्ह्यात जामीन मिळण्याकामी दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी नामे मनसुबराव देशमुख पोलीस पाटील, सवडद यांनी पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथे तोंडी रिपोर्ट दिला की, दिनांक २७.०७.२०२३ रोजी सकाळी ०६.३० वाजता त्यांना गावातील प्रकाश गाडगे यांनी माहिती दिली की, मोहखेड ते सवडद शेत रस्ता, सवडद शिवार येथे शेत रस्त्यावर एका पुरूषाचे प्रेत पडलेले असून तो रक्तबंबाळ स्थितीत पडलेला आहे. त्या माहितीवरून फिर्यादी घटनास्थळी पोहोचल्यावर त्याला एका पुरूषाचे प्रेत आढळले व त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव होऊन रक्ताचा सडा पडलेला दिसला. फिर्यादीच्या रिपोर्टवरून अज्ञात इसमाविरूद्ध गुन्हा नोंदवण्यात आला. तपासादरम्यान एकूण ५ आरोपींना परिस्थिती जन्य पुराव्याच्या आधारावर अटक करण्यात आली. त्यापैकी, दोन आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६९ खाली सोडण्यात आले.

**०३]** अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. निर्मल सावळे यांनी युक्तिवाद केला की, गुन्हा हा अज्ञात व्यक्तींविरूद्ध नोंदवण्यात आलेला असून अर्जदारांचा या गुन्ह्याशी अर्थाअर्थी संबंध नाही. अर्जदारांविरूद्ध सकृत दर्शनी केस सिद्ध होत नाही. अर्जदार क्र. १, २ आणि ३ यांचा आपसात कोणताही संबंध नाही. अर्जदारांना दिनांक २७.०७.२०२३ आणि दिनांक २९.०७.२०२३ रोजी अटक करण्यात आली असून, अर्जदार हे तुरुंगात खितपत पडले आहे. प्रस्तुत प्रकरणाचा तपास हा पूर्ण झालेला असून

न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. परिणामी अर्जदारांच्या कोठडीची तपासाकामी कोणतीही आवश्यकता नाही. दोषारोपपत्र दाखल झाले असल्याने परिस्थितीत बदल झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा नव्याने विचार करून अर्जदारांना जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

०४]    अर्जदारांतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, अभियोग पक्षाच्या कथेनुसार मयत केशव भुतेकर व आरोपी क्र. १ आणि २ यांच्यात ३० वर्षांपूर्वीचा जुना वाद होता. तथापि सदरहू प्रकरण उभयपक्षात तडजोड झाले असल्याने केशव याला जिवाने मारण्याचे कोणतेही कारण उपस्थित होत नाही. तसेच त्यांच्यात जमिनिवरून वाद असल्याबाबत कोठेही फौजदारी तक्रार, तहसिलदारांकडे अर्ज किंवा न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित नाही. त्यामुळे जमिनिच्या वादावरून केशव याची हत्या करण्यात आली असे म्हणणे न्यायोचित होत नाही.

०५]    अर्जदारांतर्फे पुढे युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदार क्र. ३ हा दुसऱ्या गावातील रहिवाशी असून वेगळ्या समाजाचा आहे. त्यामुळे अर्जदारांनी षडयंत्र करून केशव याची हत्या केली असे म्हणणे न्यायोचित होत नाही. अर्जदार क्र. १ व २ हे मृतकासोबत दवाखाण्यात हजर होते, त्यामुळे ते मृतक केशवची हत्या करणे शक्य होत नाही. तसेच भारतीय पुरावा कायद्याचे कलम २७ खाली करण्यात आलेला शोध यात उशिर झालेला आहे. आरोपीच्या बयाणानुसार त्याने कपडे ठेवलेले असल्याचे दिसते, परंतु त्याने कपडे लपवले आहे असे तो बयाणात कोठेही सांगत नाही. या सर्व कारणास्तव कलम २७ भारतीय पुरावा कायद्याच्या आधारे जामीन अर्ज रद्द करणे न्यायोचित होत नाही

०६]    अर्जदारांचे विद्वान विधिज्ञाने न्यायालयाचे लक्ष जप्तीच्या वेळेवर आणि आरोपी पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथे कोणत्या वेळेस हजर होते यावर लक्ष केंद्रीत केले व आरोपींचे बयाण आणि जप्तीची वेळ यामध्ये तफावत असल्याचे दाखवले. या प्रकरणात नमूना घेतलेला नसल्याचे दाखवण्यात आले. त्यानंतर महत्त्वपूर्ण साक्षीदार नंदकीशोर पठ्ठे याचे बयाण हे शिकवलेल्या साक्षीदाराप्रमाणे असल्याने ते ग्राह्य धरण्यात येऊ नये असे सांगण्यात आले. या प्रकरणाचा उलगडा करणारे मोहसीन याचे बयाण नोंदवण्यात आले नसून त्याच्या मोबाईलचा डाटा किंवा त्याचा मोबाईल देखील जप्त करण्यात आलेला नसल्याने परिस्थिती जन्य

पुराव्याची साखळी पूर्ण होत नसल्याचे सांगितले. ऑटे ड्रायव्हर आणि डॉक्टरांचे मत यामध्ये भिन्नता असल्याने साक्षीदारांची बयाणे ही बनावट असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५–ब चे प्रमाणपत्र, जप्ती करण्यात आलेली नाही. सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील चेहेरे हे अस्पष्ट असल्याने अर्जदारांनी हत्या केली असल्याचे सिद्ध होत नाही.

०७] अर्जदारांतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, मृतकाच्या पत्नीच्या बयाणानुसार तो दिनांक १८.०७.२०२३ पासून घरबाहेर गेला होता. मृतकाला दारूचे व्यसन होते. त्यामुळे त्याची हत्या इतर कोणी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तपास पूर्ण झाला असल्याने अभियोग पक्षाचा पुरावा नष्ट करण्याचे कारण निर्माण होत नाही. अर्जदार हे अटी व शर्तींचे पूर्ण पालन करण्यास तयार आहेत. प्रकरणाचा निकाल लागण्यास उशिर होईल म्हणून अर्जदारांना जामिनावर सोडण्याची विनंती करण्यात आली. अर्जदारांच्या तर्फे माननीय सर्वोच्च न्यायालय आणि माननीय उच्च न्यायालयांच्या खालील न्यायनिर्णयांवर भरोसा ठेवण्यात आला.

**[01] Bharat Laxman Bidwe Vs. State of Maharashtra, reported in [2018(6) Mh.L.J. (Cri.) 181].**

**[02] Ashok Vs. State of Maharashtra, reported in [2016(2) Mh.L.J. (Cri.) (S.C.) 1].**

**[03] Aher Raja Khima Vs. State of Saurashtra, reported in A.I.R. 1956 S.C. 217 (V. 43 C. 45 Mar.).**

**[04] Gomtu Vs. State of Himachal Pradesh, reported in 1972 CRI. L J 687 (V 78 C 170).**

**[05] Nabi Mohomed Chand Hussein and others Vs. State of Maharashtra, reported in 1980 CRI. L. J. 860.**

०८] याउलट, विद्वान सरकारी वकील साहेबांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन प्रस्तुत अर्जाला प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी युक्तिवाद केला की, साक्षीदार ऑटोचालक याच्या जबाबावरून तीनही आरोपींनी ऑटो भाड्याने घेतला. त्यानंतर आरोपी क्र. १, २ आणि मयत केशव हे साखरखेर्डा या दिशेने जात असतांना अर्जदार त्याच्या मागे

मोटारसायकलने जात असल्याचे सर्व साक्षीदार आणि सी.सी.टी.व्ही. फुटेज वरून दिसून येते. अर्जदार हे मयतासोबत शेवटच्या क्षणी हजर असल्याने त्याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे प्रथम–दर्शनी दिसून येते. आरोपींनी कट रचून केशव याची दगडाने ठेचून हत्या केली. खुणाचा आरोप हा गंभीर स्वरूपाचा असल्याने अर्जदाराला जामीनावर सोडल्यास ते साक्षीदारांवर दबाव टाकेल व त्यांना फितूर करेल. म्हणून अर्जदारांचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विद्वान सरकारी वकील साहेबांनी विनंती केली.

**०९]** दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने दोषारोपपत्राची आणि वरील प्रकाशीत न्यायानिर्णयांची सुक्ष्म पाहणी करण्यात आली. दोषारोपपत्रात दाखल असलेले ऑटो चालक, पान टपरी मालक, दुकान चालक, इतर महत्त्वपूर्ण साक्षीदारांची बयाणे व सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये असलेल्या चित्रीकरणाच्या माहितीवरून असे दिसून येते की, घटनेच्या दिवशी आरोपींनी रू. ५००/– मध्ये भाड्याने ऑटो ठरविला. ऑटो क्र. एम.एच. २८–टी–२२७६ मध्ये आरोपी क्र. १ व २ आणि मयत केशव हे घटनास्थळाकडे जात असतांना त्या मागून आरोपी क्र. ३ मोटारसायकलने जातांना **व येतांना** दिसून आले. यावरून या परिस्थितीजन्य प्राथमिक पुराव्यावरून आरोपी क्र. १, २ व ३ हे मृतक केशव याच्यासोबत घटनास्थळाकडे जातांना व येतांना दिसून आल्याने आरोपींनी कट रचून केशव याच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली असल्याचे प्रथम–दर्शनी दिसून येते.

**१०]** याशिवाय आरोपी क्र. १ याच्या कपड्यावर रक्ताचे डाग दिसून येतात. शवविच्छेदन अहवालानुसार केशव याच्या डोक्याला मार लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे प्रथम–दर्शनी सिद्ध होते. आरोपीचे कपडे हे कबूली जबाबानुसार जप्त करण्यात आले असल्याचे भारतीय पुरावा कायद्याच्या कलम २७ नुसार दिसून येते. अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपींनी प्रथम–दर्शनी हत्या केली असल्याचे दिसून येते.

**११]** अर्जदारांतर्फे दाखल करण्यात आलेले माननीय सर्वोच्च न्यायालय आणि माननीय उच्च न्यायालयांचे न्यायनिवाडे पाहिले असता असे दिसून येते की, सर्व प्रकरणात पुराव्याअंती निकाल लागून, सर्व प्रकारच्या पुराव्यांबाबत वेगवेगळे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. परंतु प्रस्तुत प्रकरण हे प्राथमिक अवस्थेत असून प्रस्तुत प्रकरणात कोणताही पुरावा झालेला नाही. त्यामुळे वरील प्रकाशीत न्यायनिर्णयांचा फायदा अर्जदारांना होत नाही.

**१२]** अर्जदाराविरूद्ध नोंदविण्यात आलेला खुणाचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. आरोपी क्र. ३ हा पारधी समाजाचा असून तो भटकंती करणारा असल्याने, त्याला जमानत दिल्यास तो चौकशीकामी उपलब्ध होणार नाही. तसेच अर्जदारांना जामीन मिळाल्यास ते साक्षीदारांवर दबाव निर्माण करून शकतात व त्यांना साक्ष देण्यापासून परावृत्त करू शकतात. त्यामुळे गुन्ह्याचे स्वरुप, गुन्ह्यासाठी नमूद करण्यात आलेली शिक्षा, आरोपी/अर्जदारांचे कृत्य याचा सखोल विचार करता प्रस्तुत अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

**– आ दे श –**

नियमित जामीन अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वा/–

**सागर कृ मुंगीलवार**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**ठिकाण – मेहकर**
**दिनांक – १९.१२.२०२३**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – २, मेहकर

दिनांक – १९.१२.२०२३